भारतीय संघ उपांत्य फेरीत

उपांत्यपूर्व सामन्यात नेदरलँड्सवर ४-३ अशी मात

पीटीआय, क्वालालंपूर

दोन गोलच्या पिछाडीनंतरही जोरदार पुनरागमन करत भारतीय संघाने कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धेत नेदरलँड्स संघावर ४-३ असा विजय मिळवत उपांत्य फेरीत स्थान मिळाले. भारताचा सामना गुरुवारी जर्मनीशी होईल.

कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धा

जागतिक क्रमवारीत तिसऱ्या व चौथ्या स्थानी असलेल्या भारत व नेदरलँड्स यांच्यातील उपांत्यपूर्व सामना चुरशीचा झाला. मध्यांतरापर्यंत नेदरलँड्सचा संघ २-० असा आघाडीवर होता. यानंतर, भारताने पुनरागमन करताना उत्तरार्धात चार गोल झळकावले. नेदरलँड्सकडून टिमो बाएर्स (पाचव्या मिनिटाला), पोपिन व्हॅन डर हेडेन (१६व्या मि.) आणि ऑलिव्हियर होर्टेनसियस (४४व्या मि.) यांनी गोल केले. तर, भारताकडून आदित्य लालागे (३४व्या मि.), अराईजीत सिंग हुंडल (३६व्या मि.), आनंद कुशवाह (५२व्या मि.) आणि कर्णधार उत्तम सिंग (५७व्या मि.) यांनी गोल झळकावले.

नेदरलँड्स संघाने पहिल्या सत्रात आक्रमक सुरुवात करताना पेनल्टी कॉर्नरच्या साहाय्याने बोएर्सने गोल झळकावत संघाला आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्राच्या पहिल्या मिनिटाला व्हॅन डर हेडेनने दुसऱ्या पेनल्टी कॉर्नरवर गोल करीत संघाची आघाडी दुप्पट केली. ही आघाडी संघाने मध्यांतरापर्यंत कायम राखली. तिसऱ्या सत्रात लालागेने गोल करत संघाची आघाडी कमी केली आणि दोन मिनिटानंतरच अराईजीतने पेनल्टी स्ट्रोकचे रूपांतर गोलमध्ये करीत सामना २-२ असा बरोबरीत आणला. याच सत्रात ऑलिव्हियरने गोल करत नेदरलँड्सला पुन्हा ३-२ अशी आघाडी मिळवून दिली.

अखेरच्या दहा मिनिटांत भारतीय संघाने आक्रमक हॉकीचे प्रदर्शन करताना दोन गोल झळकावले. कुशवाहने गोल करीत सामना ३-३ असा बरोबरीत आणला. भारताच्या ५७व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाला, यावर उत्तम सिंगने गोल करत संघाला ४-३ असे आघाडीवर नेले. अखेरच्या दोन मिनिटांमध्ये नेदरलँड्स संघाने बरोबरीचा प्रयत्न केला, मात्र भारतीय बचावफळीने त्यांना कोणतीही संधी दिली नाही. अखेरच्या सत्रात रोहितने सलग सहा पेनल्टी कॉर्नर रोखले. या कामगिरीसाठी त्याची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली.

‘टीसीएस’कडून भागधारकांना वाढीव लाभ

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने (टीसीएस) यंदा समभाग पुनर्खरेदीअंतर्गत (बायबॅक) समभागांच्या स्वीकृतीचे गुणोत्तर वाढवून ३५ टक्क्यांवर नेऊन, समभाग पुनर्खरेदीसाठी अर्ज केलेल्या भागधारकांना वाढीव लाभ मिळवून दिला. याआधी म्हणजेच २०२२ मध्ये समभाग पुनर्खरेदीदरम्यान हे प्रमाण २४ टक्के इतके होते.

समभाग स्वीकृती गुणोत्तर म्हणजे गुंतवणूकदारांनी अर्जाद्वारे देऊ केलेल्या समभागांच्या संख्येच्या तुलनेत कंपनीने खरेदीसाठी स्वीकारलेले समभाग होय. छोट्या भागधारकांसाठी, कंपनीने समभाग पुनर्खरेदीचे गुणोत्तर (म्हणजेच पुनर्खरेदीसाठी पात्र समभागांची संख्या) प्रत्येक सहा समभागांमागे एक असे निर्धारित केले होते. इतर भागधारकांसाठी, त्यांच्याकडे असलेल्या प्रत्येक २०९ समभागांमागे हे प्रमाण दोन समभाग असे होते. प्रत्यक्षात कंपनीने छोट्या भागधारकांनी देऊ केलेल्या प्रत्येक २० समभागांमागे ७ समभागांना ‘बायबॅक’साठी स्वीकृती दर्शविली आहे.

किरकोळ महागाईत पुन्हा वाढ

कांदा-टोमॅटोच्या भाववाढीमुळे नोव्हेंबरमधील दर ५.५५ टक्क्यांवर

पीटीआय, नवी दिल्ली

अन्नधान्याच्या किमतीत वाढ झाल्याने किरकोळ महागाईचा दर नोव्हेंबरमध्ये ५.५५ टक्क्यांवर म्हणजेच तीन महिन्यांतील उच्चांकी पातळीवर पोहोचल्याचे मंगळवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीने स्पष्ट केले. त्याआधीच्या ऑक्टोबर महिन्यात तो ४.८७ टक्क्यांपर्यंत नरमला होता, तर गेल्या वर्षी नोव्हेंबर (२०२२) महिन्यात किरकोळ महागाईचा स्तर ५.८८ टक्क्यांवर नोंदवला गेला होता.

चालू वर्षात ऑगस्टमधील ६.८३ टक्के पातळीपासून महागाईचा उतरता क्रम कायम होता. ऑक्टोबरच्या तुलनेत त्यात पुन्हा ७० आधारबिंदूंनी वाढ दिसून आली आहे. तरी हा दर सलग तीन महिने रिझर्व्ह बँकेच्या सहनशील पातळीच्या २ ते ६ टक्क्यांच्या मर्यादेत राहिला आहे. मात्र ४ टक्क्यांच्या मध्यम-मुदतीच्या लक्ष्यापेक्षा हा दर सलग ५० महिन्यांत अधिक राहिला आहे.

सरलेल्या नोव्हेंबरमध्ये कडाडलेल्या अन्नधान्य आणि अन्य भाज्यांच्या किमती वाढवणाऱ्या प्रभावामुळे पुन्हा महागाई दराने तीन महिन्यातील उच्चांकी पातळीशी बरोबरी साधली आहे. अन्नधान्य श्रेणीतील महागाई दर ८.७० टक्क्यांवर पोहोचला आहे. जो ऑक्टोबर महिन्यात नोंदवलेल्या ६.६१ टक्क्यांच्या तुलनेत वाढला आहे. भाज्यांच्या किमतींचे एकूण ग्राहक किंमत निर्देशांकातील भारमान १७.७० टक्के इतके आहे. गेल्या महिनाभरात कांद्याच्या कडाडलेल्या किमतीचे प्रतिबिंब त्यात दिसत आहे. मासिक आधारावर कांदा आणि टोमॅटोच्या किमतीत अनुक्रमे ४८ टक्के आणि ४१ टक्क्यांची वाढ झाली.

डाळी आणि फळांमधील महागाई दर अनुक्रमे २०.२३ टक्के आणि १०.९५ टक्के असा वाढता राहिला आहे. तर इंधन आणि ऊर्जा श्रेणीतील महागाई घटली असून ती (उणे) -०.७७ नोंदवली गेली. गेल्याच आठवड्यात, रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने महागाई वाढीची जोखीम लक्षात घेऊन व्याजदर आहे त्या पातळीवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. नोव्हेंबर आणि डिसेंबरमधील महागाई दर पुन्हा उसळी घेतील, असे मध्यवर्ती बँकेचेही भाकीत होते.

‘आयपीओं’साठी ७० टक्के अर्ज ‘यूपीआय’च्या माध्यमातून

वृत्तसंस्था, मुंबई :

भांडवली बाजारात किरकोळ गुंतवणूकदारांच्या जोरदार प्रतिसादामुळे कंपन्यांकडून प्राथमिक बाजारातून निधी उभारणी तेजीत आहे. गेल्या महिन्यात भांडवली बाजारात ‘आयपीओ’साठी अर्जांचा पाऊस पडला. त्यापैकी ७० टक्के अर्ज हे नव्या युगाच्या रोकडरहित पर्याय असलेल्या युनिफाइड पेमेंट इंटरफेस अर्थात ‘यूपीआय’च्या माध्यमातून आले आहेत, अशी माहिती नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे (एनपीसीआय) व्यवस्थापकीय संचालक दिलीप आसबे यांनी दिली.

गेल्या महिन्यात प्राथमिक बाजाराला एकसाथ धडक देणाऱ्या पाच कंपन्यांच्या प्रारंभिक समभाग विक्रीला (आयपीओ) गुंतवणूकदारांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. केंद्राच्या मालकीच्या ‘इरेडा’सह, टाटा टेक्नॉलॉजीज, गांधार ऑइल रिफायनरी इंडिया, फ्लेअर रायटिंग इंडस्ट्रीज आणि फेडबँक फायनान्शियलच्या समभागांसाठी अर्जांचा पाऊस पडला.

रिंकू, सूर्यकुमारची चमक

ग्वेबेर्हा : रिंकू सिंह (३९ चेंडूंत नाबाद ६८ धावा) आणि कर्णधार सूर्यकुमार यादवच्या (३६ चेंडूंत ५६ धावा) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात १९.३ षटकांत ७ बाद १८० धावा केल्या. मात्र, पावसाच्या व्यत्ययानंतर आफ्रिकेला १५ षटकांत १५२ धावांचे सुधारित लक्ष्य देण्यात आले.

सामन्यात नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. फलंदाजीला उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. परिस्थिती गोलंदाजांना अनुकूल असल्याने दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी भारतावर दबाव निर्माण केला. सलामीवीर यशस्वी जैस्वाल (०) व शुभमन गिल (०) हे लवकर बाद झाल्याने भारताची अवस्था २ बाद ६ अशी बिकट झाली. यानंतर युवा तिलक वर्मा (२९) व सूर्यकुमार यांनी संघाचा डाव सावरला. दोघांनीही दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीसमोर आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी तिसऱ्या गड्यासाठी ४९ धावांची भागीदारी रचली. तिलकला जेराल्ड कोएट्झीने बाद करत भारताला तिसरा धक्का दिला.

आठ वर्षांनी महाराष्ट्राचा महिला संघ उपांत्य फेरीत

लोकसत्ता क्रीडा प्रतिनिधी

पुणे : स्पर्धापूर्व संघनिवडीचा संघर्ष विसरून जात मैदानावर महाराष्ट्राच्या युवा खेळाडूंनी कमालीची एकजूट दाखवत ७०व्या राष्ट्रीय महिला कबड्डी स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. महाराष्ट्राच्या महिलांनी पंजाबमध्ये रुपनगर येथे सुरू असलेल्या स्पर्धेत मंगळवारी प्रथम गोव्याचा ३७-२४ आणि नंतर कर्नाटकचा ३५-२५ असा पराभव केला. महाराष्ट्राच्या महिला संघाने आठ वर्षांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला असून, आता त्यांच्यासमोर २०१७ पासून विजेत्या असलेल्या हिमाचल प्रदेशचे तगडे आव्हान असणार आहे.

राष्ट्रीय महिला कबड्डी स्पर्धा

महाराष्ट्राच्या आम्रपाली गलांडे आणि सलोनी गजमल या दोन चढाईपटूंना प्रतिस्पर्ध्यांना रोखणे सातत्याने कठीण जात आहे. मंगळवारच्या दोन्ही सामन्यांत हेच ठळकपणे दिसून आले. गोवाविरुद्ध कर्णधार आम्रपालीने एकाच चढाईत ७ गुणांची कमाई करताना गोव्यावर लोण दिला होता. या वेळी तिने गोव्याच्या अंगणात असलेल्या पाचही खेळाडूंना टिपले. विशेष म्हणजे स्पर्धेच्या पहिल्या सामन्यातही छत्तीसगडविरुद्ध आम्रपालीने अशीच सात गुणांची चढाई केली होती. मात्र, त्या वेळी पंचांनी तीनच गुण दिले होते.

अशा निर्विवाद वर्चस्वामुळे मध्यंतराच्या १४-११ अशा छोट्याशा आघाडीनंतर महाराष्ट्राने गोव्याचे आव्हान सहज संपुष्टात आणले. संध्याकाळच्या सत्रात कर्नाटकच्या बचावफळीलाही आम्रपाली आणि सलोनी यांनी सातत्याने आव्हान दिले. या दोघींच्या एक-दोन पकडी झाल्या असल्या तरी त्यांच्या यशस्वी चढायांची संख्या अधिक होती. कधी गडी बाद करून, तर कधी बोनस गुणांसह त्यांनी महाराष्ट्राची गुणसंख्या वाढवतच नेली. अखेरच्या तीन मिनिटांत २९-२३ अशा स्थितीत मंदिरा कोमकरने तीन जणीत कर्नाटकच्या चढाईपटूची अव्वल पकड घेतली. त्यानंतर पुन्हा एकदा अशी लोणची परिस्थिती असताना मंदिराने पुन्हा अव्वल पकड घेत महाराष्ट्राची आघाडी भक्कम केली.

महाराष्ट्राच्या या यशात मैदानात उतरलेल्या सातही खेळाडूंचा सारखाच वाटा राहिला. विशेष म्हणजे सामना अखेरच्या मिनिटांत निर्णायक क्षणात असताना राखीव खेळाडूंत बसलेल्या स्नेहा शिंदेलादेखील भावना रोखता आल्या नाहीत. सहकाऱ्यांना जोशात प्रेरित करण्याच्या नादात तिला ग्रीन कार्ड स्वीकारावे लागले इतक्या संघातील प्रत्येक खेळाडू या सामन्यात गुंतल्या होत्या.

देशात १,१४,९०२ नोंदणीकृत नवउद्यमी उपक्रम

पीटीआय, नवी दिल्ली

सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्न आणि पाठबळामुळे देशातील नोंदणीकृत नवउद्यमी (स्टार्टअप) उपक्रमांची संख्या ऑक्टोबरअखेरपर्यंत १,१४,९०२ पर्यंत वाढली आहे, अशी माहिती बुधवारी संसदेत देण्यात आली. हे नवउद्यमी महत्त्वाकांक्षी ‘स्टार्टअप इंडिया’ उपक्रमांतर्गत कर आणि करोत्तर वित्तीय प्रोत्साहन मिळविण्यासाठी पात्र आहेत.

देशात नवउद्यमी संस्कृतीला चालना देण्यासाठी एक मजबूत परिसंस्था तयार करण्याच्या उद्देशाने १६ जानेवारी २०१६ रोजी ‘स्टार्टअप इंडिया’ उपक्रम सरकारने सुरू केला होता. अर्थव्यवस्थेत वाढीसह, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे उद्दिष्ट यातून राखण्यात आले आहे. हे मान्यताप्राप्त नवउद्यमी उपक्रम माहिती-तंत्रज्ञान सेवा, वित्त तंत्रज्ञान, हार्डवेअर तंत्रज्ञान, एंटरप्राइज सॉफ्टवेअर, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नॅनोटेक्नॉलॉजी यांसारख्या ५६ वैविध्यपूर्ण क्षेत्रांमध्ये पसरलेले आहेत, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग पीयूष गोयल यांनी दिली.

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालयः 27 बीकेसी, सी 27, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड - 400051
शाखा कार्यालयः दुकान क्र. 3, तळ मजला व मेझनीन मजला, सम्राट क्युबिझम, गंगापूर रोड, आनंदवल्ली, नाशिक 422013

मत्तेची ऑनलाईन ई-निविदा विक्री

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या नियम 8(5) अंतर्गत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की **पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (यापुढे ‘‘पीएचएफएल’’ असा उल्लेख करण्यात येईल)** यांनी **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड** यांचे नावे कर्ज अभिहस्तांकित केल्यानंतर **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (यापुढे ‘‘केएमबीएल’’ असा उल्लेख करण्यात येईल)** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांचे वतीने खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा ताबा घेतलेला असून, सदर मालमत्तेची सुरक्षित धनको केएमबीएल यांना **श्री बापू जगन्नाथ, श्रीमती संध्या बापू हिरे** यांचेकडून **कर्ज खाते क्र. HL/0117/H/13/100014** अंतर्गत **दि. 05.12.2023 रोजीनुसार थकबाकी रक्कम रु. 14,35,326/- (रुपये चौदा लक्ष पस्तीस हजार तीनशे सव्वीस फक्त)** अधिक **दि. 06.12.2023 पासून संपूर्ण भरणा करेपर्यंतच्या पुढील लागू व्याज व शुल्के व अधिभार एवढ्या रकमेच्या वसुलीसाठी दि. 19.01.2024 रोजी दु. 12.00 ते 01.00 वाजेपर्यंत 5 मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारांसह ‘‘जशी आहे जेथे आहे’’, ‘‘जशी आहे जे काही आहे’’ आणि ‘‘तेथे जे काही आहे’’ तत्त्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत रु. 18,00,000/- (रुपये अठरा लक्ष फक्त) आणि बयाणा रक्कम रु. 1,80,000/- (रुपये एक लक्ष ऐंशी हजार फक्त) असेल आणि केवायसीसह बयाणा रक्कम सादर करण्याचा शेवटचा दिनांक आहे 18.01.2024 रोजी सायं. 6:00 वाजेपर्यंत (भाप्रवे).**

मालमत्तेचे वर्णन: भाग क्र. I - सुमारे 32.51 चौ.मी. म्हणजे 349.93 चौ.फू. मोकळी मध्यवर्ती जमीन. **भाग क्र. 2** - संयुक्तपणे आजूबाजूला असणारी (भाग क्र. 1 व भाग क्र. 2) सुमारे 70.00 चौ.मी. म्हणजे 753.48 चौ.फू. दक्षिणेकडील (पश्चिम-दक्षिण कोपरा) मोकळी जमीन. जमिनीचे एकूण क्षेत्रफळ सुमारे 102.51 चौ.मी. म्हणजे 1103.41 चौ.फू., ही जमीन एकूण सुमारे 280.00 चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या प्लॉट क्र. 17 पैकी पश्चिमेकडील सुमारे 140.00 चौ.मी. जमिनीपैकी आहे, सर्वे क्र. 272/2 पी, रामेश्वर कॉलनी, मेहरूण शिवार, जळगाव, जि. जळगाव, महाराष्ट्र - 425001. **चतुःसीमाः पूर्वेस** - सदर प्लॉटचा भाग, **पश्चिमेस** - रस्ता, **उत्तरेस** - सदरचा भाग, **दक्षिणेस** - वापर व रस्ता.

अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग 8 कडे वेधण्यात येते. कर्जदार आणि सर्व लोकांनी लक्षात घ्यावे की कुठल्याही कारणास्तव सदर लिलाव अयशस्वी झाल्यास सुरक्षित धनकोस खाजगी तहाद्वारे अनामतीवर कारवाई करण्याचा अधिकार असेल. विक्रीसाठी काढण्यात आलेल्या मत्तांच्या संदर्भात काही खुलासा/आवश्यकता असल्यास बोलीदारांनी कृपया **श्री ज्ञानेश्वर जडे (+91 9420101280)**, **श्री निलेश देसाई (+91 9822501623)**, **श्री गुरपाल सिंग (+91 9592921114)** आणि **राजेंद्र दहिया (+91 8448264515)** यांचेशी संपर्क साधावा. **विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया कोटक महिंद्रा बँकची वेबसाईट म्हणजे https://www.kotak.com येथे दिलेली www.kotak.com/en/bank-auctions.html ही लिंक पाहावी किंवा https://bankauctions.in/ येथे भेट द्यावी.**

स्थानः जळगाव दिनांकः 13.12.2023 | **प्राधिकृत अधिकारी, कोटक महिंद्रा बँक लिमिटेड करिता**

ऋण वसूली अधिकरण

सीजीओ कॉम्प्लेक्स, बी ब्लॉक, दुसरा मजला, सेमिनरी हिल्स, नागपूर - 440006

ओ.ए. नं. 28/2023 F.F. 22.01.2024

बँक ऑफ बडोदा
विरुध्द
आर्यन दिनेशलाल अग्रवाल

प्रति,

प्रतिवादी क्रमांक 1.: **श्री. आर्यन दिनेशलाल अग्रवाल**
राहणार प्लॉट नं. 121, अजनी चौक, अजित बेकरीच्या मागे, अजनी, नागपूर - 440003.

प्रतिवादी क्रमांक 2.: **श्रीमती उषा दिनेश तांबे**
राहणार प्लॉट नं. 118, उदय नगर रिंग रोड, सुभेदार लेआऊट, सुदर्शन कॉलनी, अयोध्या नगर, नागपूर - 440024.

वृत्तपत्र प्रकाशनाद्वारे समन्स/ नोटीस

1. या अधिकरणासमोर रु. 23,50,000/- यासह वर्तमान आणि भविष्यातील व्याज, खर्च आणि इतर सवलतीच्या वसुलीसाठी अर्ज केल्याची नोंद घ्या.
2. जर हा समन्स प्रतिवादी क्र.1 आणि 2 ला प्राप्त न झाल्यास बदली सेवेद्वारे प्रतिवादींना हा समन्स पाठविण्यास या अधिकरणाने मान्यता दिली आहे.
3. वर नमूद केलेल्या प्रतिवादी / प्रतिवादींना / याद्वारे या अधिकरणासमोर व्यक्तिशः किंवा वकिलामार्फत किंवा रीतसर अधिकृत एजंट मार्फत हजर राहण्याचे आणि **दि. 22/01/2024 रोजी सकाळी 10.30 वाजता** उत्तर दाखल करण्याचे / सांगण्याचे आणि मदतीची प्रार्थना का मंजूर केली जावू नये, याची कारणे दाखविणारे विधान लिखित स्वरुपात फाईल करण्याचे निर्देश दिले आहेत.
4. लक्षात घ्या की चुक झाल्यास अर्ज / अपील तुमच्या अनुपस्थितीत ऐकले जाईल आणि त्यावर निर्णय घेतला जाईल.

दिनांक 07 नोव्हेंबर 2023 नागपूर येथे माझे सहीनिशी अधिकरणाचा शिक्का दिला आहे.

शिक्का

स्वा./-आर्यन कुमार
सहाय्यक रजिस्ट्रार
ऋण वसुली अधिकरण नागपूर

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India undertaking
आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

क्षेत्रीय कार्यालय, १माला, आयुर मॉल, विदर्भ आयुर्वेदिक कॉलेज, दस्तूर नगर, फारशी स्टॉप रोड, अमरावती-444606

अचल संपत्ती विक्री करीता विक्री सुचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) च्या तरतुदी अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरीता ई-लिलाव विक्री सूचना.

विशेषतः कर्जदार आणि जमानतदार आणि सर्वसामान्य जनतेला याव्दारे सूचीत करण्यात येते की, खाली वर्णन करण्यात आलेली स्थावर असलेली सुरक्षित मालमत्ता युनियन बँक ऑफ इंडियाकडे गहाण / चार्ज असून युनियन बँक ऑफ इंडिया चे प्राधिकृत अधिकारी यांच्याव्दारे **सांकेतिक / प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे ज्याचे विवरण खालील प्रमाणे **‘‘जे आहे जेथे आहे’’, जे आहे जसे आहे’’** आणि **‘‘जे आहे तिथे आहे’’** या आधारावर खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जमानतदारांकडून नमूद केल्याप्रमाणे थकबाकी वसुलीसाठी विक्री केली जाईल. राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खालीलप्रमाणे आहे :

युनियन बँक ऑफ इंडिया, राणा एंपायर मध्ये यवतमाळ शाखा, मुख्य पोस्ट ऑफिस जवळ, धामनगांव रोड, यवतमाळ - 445001
श्री. प्रतीक कुमार (बीएम) मो. 7030910870

1.	**कर्जदार आणि जमानतदाराचे नाव :** मेसर्स राणा आईल इन्डस्ट्रिज भागीदार : 1. श्री. नौशद हसमअली करानी आणि 2. श्रीमती. मल्लीका नौशद करानी (कर्जदार) **जमानतदार :** 1. श्री. नौशद हसमअली करानी 2. श्रीमती मल्लीका नौशद करानी 3. श्री. हुसैनअली हसमअली करानी 4. श्रीमती झरीनाबाई हसमअली करानी 5. श्री. साईनाथ यादवराव मोटेवार 6. मेसर्स राणा कॉटन प्रेसिंग फॅक्ट्री 7. मेसर्स राणा कॉटन कंपनी	**देय रक्कम रु. 9,22,99,542.48** (दिनांक 01/09/2021 मागणी सुचनेनुसार) आणि त्यावरील पुढील व्याज आणि खर्च
	संपत्ती क्र. 1अ. (प्रत्यक्ष ताबा) सर्व भाग आणि तुकडा प्लॉट नं. बी-2, क्षेत्रफळ 17,786 चौ.मी (191448 चौ.फुट) अतिरिक्त यवतमाळ औद्योगीक एरिया येथे स्थित दारवा रोड, मौजा-भोयर जि. यवतमाळ. चतुर्सिमाः- उत्तरः प्लॉट नं. बी-3, दक्षिणः प्लॉट नं. बी-1, पुर्वः नाला, पश्चिमः एमआयडीसी रोड. **राखिव किंमत : रु. 1,82,58,000.00 जमा करायची बयाणा रक्कम : रु. 18,25,800.00**	

ई-लिलावाची दिनांक आणि वेळ : 29.12.2023 (दुपारी 12.00 ते सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत)

विक्री व नोंदणी आणि लॉगिन व बिडींगच्या नियम आणि शर्तीसाठी वेबसाईटला भेट द्या.
https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp
टिप : शेवटच्या क्षणाची गर्दी टाळण्यासाठी सर्व बोलीदारांना विनंती करण्यात येते की वरील वेबसाइटला भेट द्यावे व ई-लिलावाच्या तारखेपूर्वी किमान 2 ते 3 दिवसापुर्वी नोंदणी , केवायसी अपडेशन व पेमेंट पूर्ण करावे.
भारांचे तपशील, सुरक्षित कर्जदारांना माहित असल्यास: “शाखेला माहित नाही
बोली वाढीची रक्कम : राखीव किंमतीच्या 1%
ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख: **28.12.2023**रोजी किंवा त्यापूर्वी संध्याकाळी 5 वाजता

दिनांकः 12.12.2023
स्थानः यवतमाळ

अधिकृत अधिकारी,
यूनियन बँक ऑफ इंडिया

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

क्षेत्रिय कार्यालय, नागपूर
३४/२, आशिर्वाद कमर्शियल कॉम्प्लेक्स, सेन्ट्रल बाजार रोड,
रामदासपेठ, नागपुर – १०
फोन नं. ०७१२–२४६१०४२

ई–लिलाव विक्री सुचना – अचल संपत्ती विक्री करिता विक्री सुचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदी अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना.

विशेषतः कर्जदार आणि जमानतदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचीत करण्यात येते की, खाली वर्णन करण्यात आलेली मालमत्ता, सेक्युर्ड क्रेडिटर, युनियन बँक ऑफ इंडिया कडे गहाण असून युनियन बँक ऑफ इंडिया चे प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे **सांकेतिक/वास्तविक** ताबा घेण्यात आलेला आहे. ज्याचे दिनांक २९.१२.२०२३ रोजी **‘‘जे आहे जेथे आहे’’, ‘‘जे आहे जसे आहे’’ आणि ‘‘जे आहे तिथे आहे’’** या तत्वावर विक्री केली जाईल.

शाखा : आस्ति वसुली शाखा, नागपूर
शॉप नं. एफ-१/२/३/६/७/८, गोविंदा गौरखेडे कॉम्प्लेक्स (१ला माळा), ख.नं. ९१/१, हजारीपहाड, सेमिनरी हिल, नागपूर, महाराष्ट्र – ४४०००६. संपर्क क्र. ९४२५२४६४२९

१	**कर्जदार आणि जमानतदाराचे नाव : मे. बशीर ऑईल मिल्स,** भागीदार / जमानतदार : १. इरफान हाजी जब्बार चीनी, २. लुबना इरफान चीनी, ३. तौसिफ यासीन चीनी, ४. जब्बार इशाक चीनी, ५. यासीन इशाक हाजी दादा,६. हसीना मकबूल चीनी, ७. सुनेहरा हाजी इंतेखाब चीनी, ८. राबिया फैजल चिनी	**देय रक्कम रु. १३,३३,८५,५३३.९३** (दिनांक ०१.०९.२०१८ च्या मागणी सुचनानुसार) आणि त्यावर व्याज
१.१	**मालमत्ता क्रमांक १ (सांकेतिक ताबा)** खसरा / सर्व्हे नं. ३४ (सर्व्हे नं. १५७/१ ते ६) चा ६८०० चौरस मीटर क्षेत्रफळ असणाऱ्या बिगर–शेती जमिनीचा ते सर्व तुकडा आणि पार्सल. खसरा / सर्व्हे नं. ३५ (जुना सर्व्हे नं. ६६) ३५०० चौ.मीटर, एकुण क्षेत्रफळ १०३००.०० चौ.मीटर. मौजा–खानजी, ऑक्युपेन्सी वर्ग १ येथे वसलेल्या शीट नं. १२, सिटी सर्व्हे नं. २६० आणि नगर परिषद मालमत्ता नं. ०१०००४११ (जुना मालमत्ता नं. १–४०२), तहसील–वरोरा, जि. चंद्रपूर येथे असलेली बिल्डींग श्री. जब्बार इसहाक चीनी (भागीदार) आणि यासीन इसहाक चीनी (भागीदार) च्या नावावर आहे. **चर्तु:सिमा :** पूर्व: रेल्वे स्टेशन रोड, पश्चिम: गोरक्षन आणि फील्ड ऑफ आगलावे, उत्तर: श्री पंपट्टीवार हाऊस, दक्षिण: श्री भीकमचंद चोरडिया यांचे घर. **राखीव किंमत : रु. ७,४०,२६,०००.०० (रुपये सात कोटी चाळीस लक्ष सव्वीस हजार फक्त), ई.एम.डी. : रु. ७४,०२,६००.०० (रुपये चौऱ्याहत्तर लक्ष दोन हजार सहाशे फक्त)**	
१.२	**मालमत्ता क्रमांक २ (सांकेतिक ताबा)** प्लॉट नं. ९७, ९८, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०४ (एकूण ८ प्लॉट), एकूण २४५१.५६ चौ.मीटर, मौजा चिनोरा, ब.नं. १९३, प.ह. नं. १७, सर्व्हे नं. ८४/१, तहसील– वरोरा, जि. चंद्रपूर, श्री. इरफान हाजी जब्बार चीनी (भागीदार) यांचे नावाने आहेत. **चर्तु:सिमा :** पूर्व : प्लॉट नं. ७७ ते ९१, पश्चिम : पंधण रोड, उत्तर : भुमापन नं. ७४, दक्षिण: प्लॉट नं. ९६. **राखीव किंमत : रु. ४१,४३,०००.०० (रुपये एक्केचाळीस लक्ष त्रेचाळीस हजार फक्त), ई.एम.डी. : रु. ४,१४,३००.०० (रुपये चार लक्ष चौदा हजार तीनशे फक्त)**	
२	**कर्जदार आणि जमानतदाराचे नाव : श्री विनायक कॉटेक्स प्रा.लि.** संचालक / जमानतदार : श्री अभिजीत बापूरावजी दुधाने (मृतक) द्वारे कायदेशिर वारसदार १. श्रीमती रशमी अभिजीत दुधाने (पत्नी), २. कु. राधिका अभिजीत दुधाने (पुत्री), श्री अमोल रमेशराव भोंगे, श्री दिनेश वसंतराय वासानी, श्री हितेश हरीदास वासानी	**देय रक्कम रु. ११,०५,७५,२२७.४४** (दिनांक ११.०६.२०१८ च्या मागणी सुचनानुसार) आणि त्यावर व्याज
२.२	**मालमत्ता क्रमांक १ (सांकेतिक ताबा)** मौजा मारेगांव, मौजा नं. २८०, तह. जि. यवतमाळ येथील गट नं. ५०/१, ५०/२, ५२/१ व व ५२/२, जुना सर्वे नं. ६५, ही जागा व या वरील फॅक्ट्री, ऑफीस इमारती सह, जागेचे क्षेत्रफळ ६.४१ हे.आर, बिल्टअप एरिया १९२१९.४५ चौ.मी. **चतुर्सिमा** : पुर्व : श्री विनायक तेलंग यांची शेती, पश्चिम : श्री मेघराज धोपटे यांची शेती, उत्तर : श्री किसन गोशारी यांची शेती, दक्षिण : जिनींग प्रेसींग फॅक्ट्री. **राखीव किंमत : रु. ६,२९,६५,०००.०० (रुपये सहा कोटी एकोणतीस लक्ष पासष्ट हजार फक्त), ई.एम.डी. : रु. ६२,९६,५००.०० (रुपये बासष्ट लक्ष शहाण्णव हजार पाचशे फक्त)**	
३	**कर्जदार आणि जमानतदाराचे नाव : श्री सचिन रामकृष्णा दुरगकर (कर्जदार)** **आणि श्रीमती कृतिका सचिन दुरगकर (जमानतदार)**	**देय रक्कम रु. २५,०६,८०१.४२** (दिनांक ०१.०२.२०२३ च्या मागणी सुचनानुसार) आणि त्यावर व्याज
३.२	**मालमत्ता क्रमांक १ (सांकेतिक ताबा)** अविभाजित ४.०६% वाटा आणि ७७४५.०० चौ.फूट जमिनीच्या त्या सर्व तुकड्या आणि पार्सलमध्ये व्याज (७१९.५२८ चौ.मी.) एनआयटी लीजहोल्ड प्लॉट क्र. १७ च्या उत्तरेकडील भागाचा समावेश आहे. सिव्हिल स्टेशन विस्तार योजनेत, एकूण रवा समाविष्टीत एकूण १५३०० चौ.फूट संपूर्ण जमिनीचा एक भाग असल्याने ख.क्र. ७८, मौजा अंबाझरी, बेअरिंग आपार्टमेंट क्र. २०१ कव्हरिंग बिल्टअप एरिया १६६०.२३ चौ.फूट इमारतीच्या तिसरे आणि चौथे मजल्यावर उभा असलेल्या आणि पितृ–वैभव अपार्टमेंट कॉर्पोरेशन हाऊस क्र. २०, सिटी सर्व्हे क्र. ५११, शिट क्र. २९, ३२/११, ३५, धरमपेठ एक्स्टेंशन शिवाजीनगर येथे स्थित नागपूर प्रभाग क्र. ७३, सर्कल क्र. २०, डिव्हीजन क्र. ८, ता. व जि. नागपूर. **चतुर्सिमा** : पुर्व : लेन, पश्चिम : प्लॉट क्र. १६, उत्तर : कंझर्व्हन्सी लेन, दक्षिण : रोड. **राखीव किंमत : रु. १,०७,९१,०००.०० (रुपये एक कोटी सात लक्ष एक्याण्णव हजार फक्त), ई.एम.डी. : रु. १०,७९,१००.०० (रुपये दहा लक्ष एकोणऐंशी हजार शंभर फक्त)**	

ई.एम.डीची शेवटची दिनांक : २८.१२.२०२३ (सायं. ५.०० वाजे पर्यंत) | **ई–लिलावाची दिनांक आणि वेळ: २९.१२.२०२३ (स. ११ ते सायं. ५ पर्यंत)**

विक्रीच्या नियम, अटी व नोंदणी व लॉगिन व बिडिंग नियम साठी भेट द्या
https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp
टीपः शेवटच्या क्षणाची धावपळ टाळण्यासाठी सर्व निविदाकारांना विनंती करण्यात येते की वरील साइटला भेट द्यावे व ई–लिलावाच्या तारखेपूर्वी किमान १ आठवड्याच्या आधी नोंदणी, केवायसी डॉक्युमेंट अपलोड व ई.एम.डी पेमेंट पूर्ण करावे.

दिनांक : १२.१२.२०२३
स्थळ : नागपूर

अधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

नोट : संबंधित जाहिरातीचे भाषांतर इंग्रजीवरुन करण्यात आले आहे, तरी अधिक अचूक माहितीसाठी इंग्रजी जाहिरात ग्राह्य धरण्यात येईल.

हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, अॅडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.